**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १ ते ३/२०१७-१८/२१७ दिनांक: ०६-०६-२०१७

## आदेश
## आदेश केस क्र. १ ते ३ /२०१७-२०१८

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. बाळासाो मारुती मोटे, कंठी ता.जत.जि. सांगली | **तक्रार** |
| २) | श्री हुसेन आप्पासाो मुल्ला , मु.पो. बसरगी ता. जत,जि.सांगली | **अर्जदार** |
| ३) | श्री चंद्रशेखर उमाणा अंदनगोळ,कात्येनबोबलाद ता. जत. जि. सांगली | **(ग्राहक)** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मंडल कार्यालय, सांगली | |
| २) | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभाग कवठे महाकाळ | **विरुध्द पक्षकार** |
| ३) | उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग जत | |

**कोरमः-** १.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## संयुक्त न्यायनिर्णय

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

१) प्रस्तुतच्या तीनही प्रकरणातील तक्रारदार यांनी शेती पंपासाठी नविन वीज जोडणी आणि विलंबाची भरपाई मागितली असून या सर्व प्रकरणांचे स्वरुप समान प्रकारचे असल्याने त्यांचा निर्णय या संयुक्त न्यायनिर्णयाने (Common Judgment) करणेत येत आहे.

## <u>गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप.</u>

२) केस क्र.१ मधील तक्रारदार श्री बाळासाहेब मोटे, यांनी शेती पंपासाठी नविन वीज जोडणी मिळणेसाठी वि.प. यांच्या संबंधीत कार्यालयात अर्ज सादर करुन दि. २३-०२-२०१६ रोजी रु. ६,१००/- जमा केले. परंतु नियमाप्रमाणे त्यांना तीन महिन्यात वीज जोडणी मिळाली नाही. त्यामुळे अखेर त्यांनी दिनांक १८-०१-२०१७ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार दाखल केली. सदर कक्षाने दिनांक १८-०३-२०१७ रोजी दिलेल्या आदेशाने समाधान झाले नसल्याने त्यानी या मंचाकडे हे अपिल दि. ०७-०४-२०१७ रोजी दाखल केले आहे.

केस क्र.२ मधील तक्रारदार श्री हुसेन मुल्ला यांनी शेती पपासाठी नविन वीज जोडणी मिळणेचा अर्ज वि.प.कडे सादर केला आणि दि. ०४-०७-२०१४ रोजी जरुर ती रु. ६,१००/- भरणा करुनही त्यांना वीज जोडणी ३ महिन्यात मिळाली नाही. म्हणून त्यांनी उपरोकत कक्षाकडे दि. ०३-०२-२०१७ रोजी तक्रार दाखल केली. सदर कक्षाने दि. ०१-०४-२०१७ रोजी केलेल्या आदेशावर नाराज होऊन हे अपिल या मंचासमोर दिनांक ०७-०४-२०१७ रोजी दाखल केले आहे.

केस क्र.३ मधील तक्रारदार श्री चंद्रशेखर अंदनगोळ यांनी शेती पंपासाठी नविन वीज जोडणी मिळणेसाठी वि.प.यांचेकडे अर्ज सादर करुन दिनांक २३-१२-२०१४ रोजी जरुर ती रक्कम रु. ६,१००/- भरणा केली आहे. परंतु त्यांना तीन महिन्यात नियमानुसार वीज जोडणी दिली नसल्याने त्यांना उपरोक्त कक्षाकडे दिनांक १८-०१-२०१७ रोजी तक्रार दाखल केली. तथापि सदर कक्षाच्या दिनांक १८-०३-२०१७ च्या आदेशाने समाधानन झाल्यामुळे त्यांनी हे अपिल दि.०७-०४-२०१७ रोजी इकडे दाखल केले आहे.

३) वरील सर्व तक्रारदार यांनी एका निश्चित कालमर्यादित नविन वीज जोडणी देणेबद्दल आदेशा करुन झालेल्या विलंबाची भरपाई प्रतिआठवडा १०० रु. प्रमाणे वि.प.कडून मिळणेबद्दल आपल्या अपिल अर्जात मागणी केली आहे.

## <u>वि. प. यांची भूमिका.</u>

४) वि.प. यांच्या म्हणण्याप्रमाणे तक्रारदार बाळासाहेब यांना वीज जोडणी देण्यासाठी ०.०६ कि.मी. कमी दाब वाहिनीची आवश्यकता असून त्यांच्या जेष्ठता यादीत ९७३ वा क्रमांक आहे. तक्रारदार हुसेन मुल्ला यांचा प्रतिक्षा यादीत ३७८ वा क्रमांक आहे. तक्रारदार - चंद्रशेखर यांना वीज जोडणी देण्यासाठी ०.७२ कि.मी. लघुदाब वाहिनी उभारावी लागणार असून त्यांचा प्रतिक्षा यादीत ३६९ वा क्रमांक आहे. वि.प. यांचे असे कथन आहे की, तक्रारदार यांना प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य या तत्वानुसार प्रतिक्षा यादीप्रमाणे वीज जोडणी देण्यात येत आहे.

५) या तीनही प्रकरणाची सुनावणी दि. ०२-०६-२०१७ रोजी या मंचासमोर घेणेत आली. त्यावेळी सर्व तक्रारदारातर्फे त्यांचे प्रतिनिधी श्री हरिभाऊ खापरे हजर होते, वि.प. यांचेतर्फे अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री आर.एम. शेमडे, उपकार्यकारी अभियंता श्री एस.ए. मैनापूरे आणि सहाय्यक अभियंता श्री एस.वाय. कोळी, हजर होते. सर्वाची तोंडी निवेदन ऐकण्यात आली. उपलब्ध कागदपत्रे वाचण्यात आली आहेत.

६) सुनावणीच्या वेळी तक्रारदारांचे प्रतिनिधी श्री खापरे यांनी विलंबाच्या भरपाईची तक्रार अर्जात केलेली मागणी स्वतःहून सोडून दिली असल्याने त्याबाबतचा विचार या निकालापत्रात यापुढे करण्यात येत नाही.

७) या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात.

१) तक्रारदार यांना निश्चित कालावधीमध्ये शेती पंपासाठी नवीन वीज जोडणी देण्याचा आदेश करणे योग्य होईल काय?

उत्तरः- होय.

२) कोणता अंतिम आदेश?

उत्तरः- शेवटी नमूद केल्याप्रमाणे.

## <u>कारणमिमांसा</u>

८) तक्रारदार श्री बाळासाहेब यांनी त्यांच्या मोजे् कंठी या गावातील गट क्र. ३०७ मध्ये, हुसेन मुल्ला यांना त्याच गावातील त्यांच्या गट क्र. ११०/२ मध्ये आणि श्री चंद्रशेखर यांनी मौजे कोतेनबोबलाद या गावातील त्यांच्या गट क्र. ३३५ मध्ये शेती पंपासाठी नविन वीज जोडणी मिळणेसाठी वि.प. यांच्या संबंधीत कार्यालयात रितसर अर्ज सादर करुन प्रत्येकी रक्कम रु. ६,१००/- जमा केले याबद्दल वाद नाही. रक्कम भरण्याच्या दिनांकाबाबतही वाद नाही. तक्रारदार यांना कृतिमानके विनियमातील तरतूदीप्रमाणे तीन महिन्यात वीज जोडणी मिळणे आवश्यक होते. परंतु सदर मुदतीत त्यांना वीज जोडणी देणेत आली नाही.

९) तक्रारदार यांना अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार अर्ज सादर केले होते. सदर कक्षाने तक्रारदार यांना जेष्ठता यादीप्रमाणे वीज कनेक्शन देणेत येतील अशा केलेल्या आदेशाने तक्रारदार यांचे समाधान झाले नाही.

१०) विद्युत कायदा २००३ च्या कलम ४३प्रमणे आणि कृतीमानके विनियम २०१४ मधील परिशिष्ट अ यातील तरतूदीप्रमाणे एका विशिष्ट कालावधीत वीज पुरवठा सुरु करण्याचे बंधन घातले आहे. त्यानुसार तक्रारदार यांना मुदतीमध्ये वीज जोडणी मिळाली नाही, हे स्पष्ट आहे. विद्यत पुरवठा संहिता विनियम २००५ मधील कलम ४.४ मध्ये "प्रथम येणा-यास प्रथम"या तत्वावर वीज पुरवठा करणेत यावा असे नमूद आहे. परंतु ही तरतूद कायद्यात किंवा विनियमात अन्य तरतूद नसल्यास लागू होईल. शिवाय कलम ४.४ मधील परंतुका. अत्यंत स्पष्ट आहे. त्यामुळे सदर कलम ४.४ हे वि.प. यांच्या मदतीस येत नाही. प्रतिक्षा यादीतील क्रमांक किंवा प्रथम येणा-यास प्रथम हे तत्व कायद्यातील स्पष्ट तरतूदीपुढे गौण ठरतात. कृतिमानके विनियमात, वीज जोडणी देण्यात विलंब केल्यास भरपाईची तरतूद आणि विद्युत कायदा कलम ४३ (३) मध्ये दंडाची तरतूद केली आहे. अर्थात , या प्रकरणांमध्ये तक्रारदारांचे प्रतिनिधी यांनी भरपाईची मागणी स्वतःहून मंचासमोर सोडून दिली आहे.

११) वरील सर्व परिस्थितीत, सर्व तक्रारदार हे निश्चित केलेल्या कालमर्यादेत वीज जोडणी मिळणेस पात्र आहेत असे आमचे निष्कर्ष आहेत.

त्यामुळे खालील प्रमाणे अंतिम आदेश करणेत येतो.

**आदेश**

१) तक्रारदार श्री बाळासाहेब मारुती मोटे , यांना वि.प. यांनी दि. १५-०९-२०१७ पर्यन्त आणि तक्रारदार श्री हुसेन आप्पासो मुल्ला व श्री चंद्रशेखर उमाणा अंदनगोळ यांना दिनांक ३१-०८-२०१७ पर्यन्त वि.प. यांनी सदर तक्रारदारांच्या अर्जानुसार कृषी पंपासाठी नविन वीज जोडणी द्यावी असा वि.प. यांना आदेश करणेत येत आहे.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|
| (श्री प्र. स. बुरांडे) | (प्र.वि. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |

टिपः- काही अपरिहार्य कारणास्तव सुनावणी दरम्यान सदस्य सचिव यांना उपस्थित राहता आले नाही, तरीही वरील निर्णयाशी ते सहमत आहेत.